माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९०/२०१८
दि.२०/०७/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्रीम.लता भालचंद्र ठाकुर, ................अपिलार्थी
मु.पेणकरपाडा, दत्त मंदिराजवळ, पो.मिरा,
भाईंदर (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

-: **विवेचन** :-

श्रीम.लता भालचंद्र ठाकुर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, कर विभाग, प्रभाग क्र.६ यांचेकडे दि.०४/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मालमत्ता क्रमांक एल०३००१६७३०००/३११ या मालमत्तेस कोणत्या सालापासून व कोणाच्या नावावर कर आकारणी करण्यात आली. तसेच सदर मालमत्ता हस्तांतरण कोणत्या साली कोणाच्या नावावर झाली त्याबाबतची कागदपत्रे सत्यप्रत करुन मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२७/०६/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, कर विभाग, प्रभाग क्र.६ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२०/०७/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/३२०/२०१८ दि.१६/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, कर विभाग, प्रभाग क्र.६ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०४/०५/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती मिळाली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, कर विभाग, प्रभाग क्र.६ यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क स्वरुपात माहिती देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्रीम.लता भालचंद्र ठाकुर,
मु.पेणकरपाडा, दत्त मंदिराजवळ, पो.मिरा,
भाईंदर (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
लिपिक, कर विभाग, प्रभाग क्र.६

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.